वर्ष- ११ | अंक- ०३ | मुंबई, मंगळवार, ३ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?

3 → लाडकीपेक्षा दोडकी व्हा...

तीन महिन्यांत ५२ हरवलेले मोबाईल शोधले ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## पृथ्वीराज चव्हाणांचा ईव्हीएमवर संशय, निवडणूक आयोगावरही मोठा आरोप; आंतरराष्ट्रीय समिती नेमण्याची केली मागणी

**मुंबई :** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरुन चकीत करणारे आकडे समोर आले आहेत. महाविकास आघाडीची सपाटून हार झाली आहे. अशातच यंदा राज्यभरातील मतटक्का वाढला आहे. महिलांनी यंदा भरभरुन मतदान केले आहे. तसेच सायंकाळी पाच वाजल्यानंतरही अनेक मतदानकेंद्रांवर रांगा लागल्या होत्या. यामुळे काँग्रेसकडून निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी निवडणूक आयोगाकडे वाढीव मतटक्क्याचे पुरावे मागितले आहेत. पटोलेंनंतर आता माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही ईव्हीएमविरोधात मास्टरस्ट्रोक टाकला आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, ५ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठ्या जागा मिळाल्या होत्या. पण विधानसभेत इतका कल बदलेल अशी परिस्थिती दिसत नाही. महाविकास आघाडीसह जनतेला आत्मविश्वास होता की, यावेळी सत्ताबदल होणार. पण आश्चर्य वाटतं की, पक्षफुटीच्या विषयाचा निवडणुकीत काहीच फरक पडला नाही. देशात लोकशाही आहे. निवडणुक फ्री आणि फेअर होणे आवश्यक आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी पुढे ईव्हीएमवरुन निवडणूक आयोगाला धारेवर धरले. ते म्हणाले, पंतप्रधानानी निवडणूक आयुक्त बदलण्याचा निर्णय घेतला तेव्हाच आम्हाला अंदाज आला होता, काहीतरी गडबड आहे. द्वेष पसरवणारी भाषण मोदी योगी यांच्याकडून करण्यात आली आहेत, त्यांच्यावर आयोगाने कारवाई केली नाही. निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे कारवाई करणे. ईव्हीएम मशीनवर जनतेचा विश्वास राहिला नाही. पण आता फेर पडताळणीचा मला तरी वाटतंय काही फायदा होणार नाही.' यासोबतच चव्हाणांनी सर्वच्या सर्व श्श्ढअळच्या चिठ्या मोजायला हव्यात अशी मागणी देखील केली आहे. पृथ्वीराज चव्हाणांनी पुढे पुन्हा ईव्हीएम तपासणीच्या मुद्द्यांवर भर दिला. 'निवडणूक आयोगाने एश्ट मशीन तपासणीसाठी दिल्या पाहिजेत.

## CM कोण? सस्पेन्स संपला, भाजप नेतृत्त्वाचा निर्णय झाला; बड्या नेत्याकडून महत्त्वाची अपडेट




**मुंबई:** विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवणाऱ्या महायुतीला अद्याप सत्ता स्थापन करता आलेली नाही. यानंतर आता भारतीय जनता पक्षाच्या गटातून मोठी बातमी आहे. भाजपकडून मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. भाजपच्या एका वरिष्ठ नेत्यानं याबद्दलची माहिती दिल्याचं वृत्त पीटीआयनं दिलं आहे. भाजपच्या विधिमंडळ पक्षाची बैठक २ किंवा ३ डिसेंबरला होणार असल्याची माहिती या नेत्यानं नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर वृत्तसंस्थेला दिली.

महायुती २.० सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला आझाद मैदानावर होणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी हजर राहतील. देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होतील. २०१४ ते २०१९ या कालावधीत त्यांनी मुख्यमंत्रिपद भूषवलं. मुख्यमंत्रिपदाचा ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे ते राज्यातील दुसरेच नेते ठरले. २०१९ मध्ये शिवसेनेनं भाजपची साथ सोडल्यानंतर फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवारांसोबत राजभवनात सकाळी उरकलेला शपथविधी चांगलाच गाजला. मात्र हे सरकार केवळ साडे तीन दिवस टिकलं. त्यानंतर आता पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या निकालाला आठवडा उलटला आहे. तरीही महायुतीत सत्ता वाटपाचा पेच कायम आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सत्ता स्थापनेचे सर्वाधिकार भाजप नेतृत्त्वाला दिले आहेत. त्यामुळे राज्यात भाजपचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला. भाजपला फडणवीसांच्याच नेतृत्वात दणदणीत विजय मिळाला. पक्षानं सलग तिसऱ्यांदा १०० चा आकडा विधानसभेत ओलांडला.

२०१४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झालेले फडणवीस २०१९ मध्येही मुख्यमंत्री होतील, अशी परिस्थिती होती. जनादेश तसाच होता. पण उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं आघाडीसोबत जात सत्ता स्थापन केली. त्यामुळे भाजपला विरोधी पक्षात बसावं लागलं. त्या काळात फडणवीस विरोधी पक्षनेते होते. २०२२ शिवसेनेत फूट पडली. एकनाथ शिंदेंनी ४० आमदारांसह ठाकरेंची साथ सोडली. त्यामुळे महाविकास आघाडी सरकार कोसळलं. भाजपशी हातमिळवणी करत शिंदे मुख्यमंत्री झाले. फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. तेव्हा भाजपच्या नेत्यांसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती.


## पालघरमध्ये मनसे नेत्यावर जीवघेणा हल्ला, वातावरण तापले; अविनाश जाधव संशयाच्या फेऱ्यात



**पालघर :** पालघर जिल्ह्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. मनसे पालघर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष समीर मोरे व त्यांच्या भावावर धारदार शस्त्राने वार करत हल्ला केल्याची घटना घडली आहे. मनसेचे अविनाश जाधव यांनी ही मारहाण केल्याचा आरोप मोरे कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेमुळे मात्र पालघरमध्ये एकच खळबळ माजली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पालघर ग्रामीण जिल्हाध्यक्ष समीर मोरे यांना लाथा बुक्क्यांनी जबर मारहाण करण्यात आली. यामध्ये त्यांचे बंधू अतिश मोरे यांच्यावर कोयते, तलवार, चाकू अशा धारदार शस्त्रांनी वार करत जीवघेणा हल्ला करण्यात आला. सतीश मोरे या हल्ल्यात जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी बोईसर येथील शगुन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर बोईसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील कार्यवाही सुरु केली आहे.

पालघर आणि ठाणे जिल्ह्यात मनसेत मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अंतर्गत वादाचे रूपांतर थेट जीवघेणा हल्ला करण्यात झाले आहे. यावर आता मनसे अध्यक्ष कोणते पाऊल उचलणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे. पालघर जिल्ह्यातील मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आज राज ठाकरेंची भेट घेऊन पराभवाची कारणं सांगितली. यावेळी मनसे नेते अविनाश जाधव यांनी निवडणूक काळात दिलेली जबाबदारी पार पाडली नसल्याची तक्रार काही मनसे पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली. यानंतर राज ठाकरे यांनी अविनाश जाधव यांची कानउघाडणी केली असल्याची देखील माहिती आहे. याचाच राग मनात धरून अविनाश जाधव यांनी हा हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे.

## बिबट्यांपासून बचावासाठी घरांभोवती उभारणार सौर कुंपण



**शहापूर / ठाणे** जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात बिबट्याचा वावर वाढू लागला आहे. त्यामुळे पशुधन आणि शेतकर्यांना धोका आहे. अशा सांभाव्य ठिकाणी, शेत शिवार, माळरानांवरील घरांभोवती सौर कुंपण लावण्याचा पथदर्शी प्रकल्पाचा प्रस्ताव शहापूर वनविभागाने तयार केला आहे. सरकारकडून मंजुरीच्या आवश्यक त्या कार्यवाहीची पूर्तता झाल्यावर या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाणार आहे. ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड, शहापूर, कल्याण, भिवंडी, माळेशज, कसारा घाट परिसरात बिबट्याचा वावर वाढला असून जंगलात लाकूडफाटा, वनोपज गोळा करणे, शेतकरी, गायी, शेळ्यांच्या गोरक्षकांवर यापूर्वी बिबट्याने हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. बिबट्या आणि मानवी वस्तीमधील हा संघर्ष वाढत चालला आहे. भक्ष्य शोधण्यासाठी अनेक वेळा रात्रीच्या वेळेत बिबटे गाव हद्दीतील गोठ्यांमध्ये येऊन पशुधन, भटक्या श्वानांवर हल्ले करतात. हे प्रकार वेळीच रोखण्यासाठी मनुष्य, पशुधन हानी रोखण्यासाठी शहापूर वन विभागाने शहापूर तालुक्यातील बिबट्यांचा वावर असलेल्या भागात गावांमधील एकांतात असलेली घरे निश्चित केली आहेत. बिबट्याचा वावरामुळे या घरांचा परिसर संवेदनशील म्हणून जाहीर केला आहे. अशा एकांत वस्तीत बिबट्याने शिरकाव केला तर त्याला वेळीच सुरक्षितपणे, कोणत्याही प्रकारचा त्रास न होता अटकाव व्हावा या उद्देशातून वन विभागाने संवेदनशील घरांभोवती सौर कुंपण उभारण्याचा निर्णय घेतला आहे. वन विभागातील एका उच्चपदस्थ अधिकार्याने ही माहिती दिली आहे.

सौरकुंपण प्रस्तावाप्रमाणे एक एकर शेती परिसरात घर, गुरांचा गोठा असेल तर त्याला संरक्षित करण्यासाठी 30 हजार रुपये खर्च येतो. या निधीतील 75 टक्के रक्कम शासकीय अनुदानातून शेतर्कयाला दिली जाईल. उर्वरित 25 टक्के रक्कम शेतर्कयाने स्वतः उभारून हा प्रकल्प आकारात आणायचा आहे. या प्रकल्पासाठी देखभाल दुरुस्तीसाठी नियमितचा खर्चही असणार नाही. बिबट्याचा वावर असलेल्या एकांतामधील घर, गोठ्याला कुंपण घातले जाईल. त्या कुंपणाच्या आतील भागात सौरपट्ट्या बसविल्या जातील. सौरपट्यांमधून तयार होणारी सौर वीज बॅटरी माध्यमातून कुंपणात सोडण्यात येईल. अचानक दिवसा, रात्री अन्य वन्यजीव किंवा बिबट्या एकांतामधील घर परिसरात भक्ष्यासाठी आला. त्याचा स्पर्श सौर कुंपणाला झाला की वन्यजीव किंवा बिबट्याला विजेचा सौम्य धक्का बसेल आणि त्याचवेळी सौर यंत्रणेवर चालणारा भोंगा वाजण्यास सुरुवात होईल. शॉक बसल्याने बिबट्या पळून जाईल आणि भोंग्याच्या आवाजामुळे शेतकरी जागा होईल. या प्रकल्पामुळे बिबट्याही सुरक्षित आणि शेतर्कयाचे कुटुंब, पशुधन एकांतात असले तरी सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे, असे असे देखील या वनाधिर्कायाने सांगितले. या पथदर्शी प्रकल्पामुळे बिबट्या किंवा वन्यजीवांस कोणत्याही प्रकारची दुखापत होणार नाही. त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होणार नाही याची विशेष काळजी या प्रकल्पात घेण्यात आली आहे. अलीकडे एकांतामधील घर परिसरात लोखंडी जाळीचे कुंपण करण्यासाठी दोन ते अडीच लाख खर्च येतो. त्याच जागी सौरउर्जेच्या माध्यमातून सौर कुंपण उभारण्याचा प्रयत्न केला तर शासकीय आर्थिक साहाय्याने तीस हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे बिबट्या, मानवातील संघर्ष थांबविण्यासाठी राबविण्यात येणारा शहापूर वनविभागाचा हा प्रस्ताव आदर्शवत ठरण्याची शक्यता आहे.

## अज्ञात मुलीची सुटका करून महिला वेश्या दलालास पोलिसांनी केली अटक



**नालासोपारा-** स्त्री वेश्यादलालास ताब्यात घेवुन पिडीत महीलेची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा शाखेस यश. अधिक माहितीनुसार दिनांक २९/११/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना बातमीदारांकडुन महिला नुरजहॉ युनुस शेख, वय ३५ वर्षे, ही वेश्याव्यवसाय करीत असुन ती तिच्या मोबाईल क्रमांकावरुन पुरुष गिऱ्हाईकांना संपर्क साधुन व्हॉटसअॅप व्दारे फोटो पाठवुन पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी मुली पुरविते .

मिळालेल्या बातमीच्या आधारे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिहाईक व दोन पंच बोलावुन त्यांना कारवाई बाबत माहीती देवुन महिला वेश्यादलाल नुरजहॉ शेख हिने सांगितल्या वसई (प) येथिल एका ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन सदर ठिकाणी छापा टाकला असता, यातील महिला वेश्यादलाल नुरजहा युनुस शेख, वय ३५ वर्षे, हिने ०१ पिडीत महिलेला वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची ५,०००/- रु रक्कम ठरवुन त्यातील कमीशन स्वतःच्या उपजिवीकेकरीता स्विकारुन पिडीत मुलींना वेश्यागमनाकरीता उपलब्ध करुन दिल्याने महिला वेश्यादलाल हिस ताब्यात घेवुन ०१ पिडित मुलीची सुटका करण्यात आली . सदर बाबत महिला वेश्यादलाल जिच्या विरुध्द पोहवा /शेट्ट यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने माणिकपुर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा), यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि / सौरभी पवार, सफौ/ गवई, पोहवा / किणी, मपोहवा / डोईफोडे, पोहवा/ शेटये, मपोहवा / तिवले, पोहवा / शिंदे, मपोशि/ पाटील सर्व नेम. अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी पार पाडली आहे.

## डोंबिवलीतील रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांकडून मुंबईतील व्यावसायिकाची १० कोटीची फसवणूक




डोंबिवली : डोंबिवली जवळील ठाकुलीर्तील एका रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांनी डोंबिवली जवळील खोणी भागातील एका जमिनीची बनावट कागदपत्रे तयार केली. ही कागदपत्रे खरी आहेत असे दाखवून मुंबईतील एक व्यावसायिक आणि त्याच्या मित्राला विक्री केली. या जमीन विक्रीच्या तडजोडीच्या व्यवहातून लोअर परेलमधील एका उच्चभ्रू गृहसंकुलातील सदनिका आपणास स्वस्तात घेऊन देतो असे सांगून रिअल इस्टेटच्या सदस्यांनी दोन जणांची १० कोटी ४० लाख रूपयांची फसवणूक केली आहे.

सन २०२१ ते २०२३ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. गेल्या पाच दिवसापूर्वी या फसवणूक प्रकरणी मुंबईतील कांदिवली परिसरात राहणा[illegible]या एका व्यावसायिकाने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी तक्रारदाराच्या तक्रारीवरून डोंबिवली जवळील ठाकुलीर्तील एका रिअल इस्टेट कंपनीच्या चार सदस्यांसह इतरांवर गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांच्या प्राथमिक तपासणी अहवालात तक्रारदाराने दिलेली माहिती अशी की, ठाकुलीर्तील रिअल इस्टेट कंपनीच्या सदस्यांनी डोंबिवली जवळील खोणी येथील एका जमिनीची बनावट कागदपत्रे तयार केली. ही कागदपत्रे सन २००७ च्या मुद्रांक शुल्क दस्तऐवजावर तयार करण्यात येऊन, ही कागदपत्रे खूप जुनी असल्याचे मुंबईतील जमीन खरेददारांना दाखविण्यात आले. या जमिनीचा मूळ मालक रिअल इस्टेटमधील एक सदस्य नसताना, ते या जमिनीचे मूळ मालक आहेत असे दस्तऐवजावर दाखविण्यात आले. ही जमीन रिअल इस्टेच्या चार आणि इतर सदस्यांनी मुंबईतील कांदिवली भागातील एक व्यावसायिक आणि त्यांच्या मित्राला विक्री केली. त्याच बरोबर या जमिनीच्या तडजोडीच्या व्यवहारातून या जमिनीबरोबर रिअल इस्टेटच्या सदस्यांनी व्यावसायिकांना आम्ही तुम्हाला लोअर परेल येथील एका उच्चभ्रू वसाहतीच्या गृहसंकुलात स्वस्त दरात सदनिका घेऊन देतो, असे खोटे आश्वासन दिले.

या आश्वासनाच्या माध्यमातून सदनिकेच्या नावे रिअल इस्टेटच्या सदस्यांनी एका व्यावसायिकाकडून सहा कोटी ९० लाख आणि त्यांच्या मित्राकडून तीन कोटी ५० लाख रुपये रिअल इस्टेटचे कार्यालय येथे स्वताच्या उपस्थितीत आणि इतर सदस्यांच्या बँक खात्यावर आरटीजीएस माध्यमातून भरणा करून घेतली. तक्रारदारांना जेव्हा जमीन व्यवहार आणि सदनिका व्यवहाराच्या माध्यमातून रिअल इस्टेटच्या सदस्यांनी आपली आर्थिक फसवणूक केली आहे हे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणात अद्याप कोणाला अटक केलेली नाही. साहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत पाटील याप्रकरणाचा तपास करत आहेत.

## म्हाडा नाही तर BMC करणार कामाठीपुराचा विकास; मुंबईत मोफत दिल्या जाणाऱ्या या घरांची काय आहे योजना?




**मुंबई :** मुंबईतील अनेक ठिकाणी बांधकाम, पुर्नविकास सुरू आहे. त्यापैकीच एक कामाठीपुरामध्येही पुर्नविकास होणार आहे. मात्र कामाठीपुराचा विकास आता महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण अर्थात म्हाडा करणार नसून बीएमसी करणार आहे. जवळपास ३९ एकरात पसरलेल्या कामाठीपुराच्या विकासाचा संपूर्ण प्लॅन म्हाडाने तयार केला होता. या प्लॅननंतर बांधकाम सुरू केलं जाणार होतं. बांधकामासाठी टेंडर मागवण्याचं काम केवळ बाकी होतं. म्हाडाने सरकारकडे टेंडर मागवण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला होता, मात्र त्या प्रस्तावाला मंजुरी न मिळता तो रद्द करण्यात आला आहे. आता कामाठीपुराचा विकास म्हाडाकडून न होता तो बीएमसीकडून होणार आहे.

स्थानिकांना मोफत घरं मिळणार

डिटेल प्रोजेक्ट रिपोर्टनुसार, स्थानिक लोकांना मोफत घरं देण्यासह म्हाडाला विक्रीसाठी जवळपास १५०० घरं मिळणार होती. निवडणुकांआधी शिंदे सरकारने एमएमआरच्या जवळपास सर्व प्रस्तावित प्रोजेक्टची टेंडर प्रक्रिया पूर्ण केली होती.

आचारसंहिता लागू होण्याआधी या प्रोजेक्टचंही टेंडर जारी केलं जाणार होतं. पण त्याआधीच या प्रोजोक्टची जबाबदारी म्हाडाऐवजी बीएमसीकडे सोपावण्यात आली.

काय आहे प्रोजेक्ट?

कामाठीपुरात जवळपास ४७५ सेस बिल्डिंग, १६३ इतर इमारती, १५ धार्मिक स्थळं, २ शाळा, ४ सरकारी कार्यलयं आहेत. या परिसरातील जवळपास ५२ इमारती कोसळल्या आहेत. रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट अंतर्गत सरकारने इथे राहणाऱ्या सर्व पात्र नागरिकांना कमीत-कमी ५०० चौरस फूट इतकी घरं मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. रिडेव्हलपमेंट अंतर्गत या भागात दोन प्रकारच्या इमारती बांधण्याची योजना आहे.

मुंबई-बेंगळुरू बायपासवर टँकर पलटी, वारजे पुलावर अपघात झाल्याने वाहतूक कोंडी

एकूण १८ इमारती नागरी सुविधांसह बांधण्याची योजना तयार करण्यात आली आहे. यात ५८ मजल्यांच्या १० इमारती असतील. तर ७८ मजल्यांच्या ८ इमारती असतील. प्रकल्पासाठी खर्च केलेली रक्कम ७८ मजल्यांच्या ८ इमारतींमधून वसूल केली जाणार आहे. ७८ मजली इमारतीतील घरं विक्री केली जाणार आहेत. तर ५८ मजल्यांच्या १० इमारतींमध्ये तेथील स्थानिक लोकांना मोफत घरं देण्यात येणार आहेत.

# शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?

**कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते. केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.**



केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.

**योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी**


## योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.

**आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –**

- **ऑईली हेअर** – काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर** – केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर** – केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर** – या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर** – केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.





# तेलकट त्वचेची काळजी कशी घ्याल!

- त्वचा तेलकट असल्यास क्लिन्झिंगला पर्याय नाही. क्लिन्झिंगमुळे त्वचेवर साठलेली घाण, मेकअप, मृत त्वचा नाहीसे होऊन रंध्रे मोकळी होतात. या उपायाने ब्लॅकहेड्सची समस्या दूर होते. आठवड्यातून एकदा लाईट स्क्रब केल्याने फायदा होतो.
- ऑईल फ्री फेसवॉश नियमित वापरल्यास त्वचा तेलकटमुक्त राहते. ग्लिसरीनयुक्त साबणाचा वापर करू नका.
- तांदळाच्या पिठीमध्ये पुदिन्याचा अर्क किंवा गुलाबजल मिसळून चेहऱ्यावर दहा मिनिटे हा पॅक ठेवावा. दहा मिनिटांनंतर हलक्या हाताने चोळून पॅक काढून टाकावा.
- पर्समध्ये नेहमी गुलाब अथवा लॅव्हेंडर बेस असलेलं स्किन टॉनिक ठेवा. त्याबरोबर वेट टिश्यूजही हवेत. दर दोन तासांनी यानं चेहरा स्वच्छ केल्यास त्वचा टवटवीत राहते.
- तेलकट त्वचेवर अँकनेचा त्रास होत असेल तर टी ट्री अँटी पिंपल जेल अथवा जेल मॉईश्चरायझर वापरणं चांगलं.
- त्वचेचं सीबम ऑईल नियंत्रणात ठेवण्यासाठी तेलकट आणि मसालेदार पदार्थ वर्ज्य केलेले चांगले. तैलीय ग्रंथीमध्ये संतुलन राखण्यासाठी फायबरयुक्त भोजन उपयुक्त आहे. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात एकेक डिश सॅलड असणं अतिआवश्यक आहे.



---

## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१

**माहिती व तंत्रज्ञान विभाग**

संकेतस्थळ – www.mbmc.gov.in ई-मेल – it@mbmc.gov.in संपर्क -२८१९२८२८ - २५१

**जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान /285/2024-25** **दिनांक 29/11/2024**

### // जाहिर नोटीस //

मिरा भाईंदर महानगरपालिका माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत AMC Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) for Computers, LAN & Servers and Facility Management Services in MBMC (एक वर्ष कालावधीकरिता ) चालु शासकीय दर उपलब्ध नसल्यामुळे खुल्या बाजारातुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत, सदरकामी विस्तृत माहिती www.mbmc.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर कामाकरीता दि. 06/12/2024 रोजी संध्या 1.00 वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय माहिती व तंत्रज्ञान विभाग, तळ मजला येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरुन देण्यात यावेत.

**जा. क्र. मनपा /मावज /ई - ३३६५४१२/२०२४-२५**
**दि. २९/११/२०२४**

**सही**
(राजकुमार एम. घरत)
सिस्टीम मॅनेजर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

---

## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)**
**मुख्य कार्यालय विरार**
**दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३**

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./१५९६/२४-२५
दिनांक :- २९/११/२०२४

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्रमांक. | रिसीट नं | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे-१ | NL२४/१०१/१३ | ३०६५ | शांति अयोतिरामन | बृजेशकूमार यादव व अनुपमा यादव |
| २ | निळेमोरे-२ | NL२५/८९/२७ | ३०६७ | हराधन पाल व कांचन पाल | विनोद व निलम देवी |
| ३ | निळेमोरे-१ | NL२४/२५/४ | ३०७५ | मावजी एम पटेल | अरविंद मावजी पटेल |
| ४ | निळेमोरे-१ | NL२४/२५/५ | ३०७३ | मावजी एम पटेल | महेश मावजी पटेल |
| ५ | निळेमोरे-२ | NL२५/८०/११ | १७९६ | सुनिता सुधाकर कदम | नेत्रा रविंद्र पवार व रविंद्र शंकर पवार |
| ६ | निळेमोरे-२ | NL२५/२/१५ | १२७९ | हेमंत त्रिवेदी | राजेश सुरेश आबनावे |
| ७ | निळेमोरे-१ | NL२४/५५/२३ | ३१३४ | विजय जाधव | मुकेश कुमार सिंह व पूजा मुकेश कूमार सिंह |
| ८ | निळेमोरे-१ | NL२४/३१/५६ | ३२२१ | नौशिन आफताब हुसेन शेख व आफताब हुसेन शेख | धनराम विरजी सुंदेचा / जसोदा धनाराम सुंदेचा |
| ९ | निळेमोरे-३ | NL२६/२३/२८ | ३१५३ | धर्मेंद्र जरीवाला | राजश्री धर्मेंद्र जारिवाला |
| १० | निळेमोरे-२ | NL२५/५४/१२ | ३३०० | स्वप्नील प्रकाश शिंदे | तपस परितोश चंद्रा व कॅमेलिया तपस चंद्रा |
| ११ | निळेमोरे-४ | NL२७/४७/११ | ३२९५ | उमेश के. दिवेकर | मोहसीन निझाम व्होरा व निझाम इब्राहिम व्होरा |
| १२ | निळेमोरे-३ | NL२६/९/१३० | ३५८३ | चंद्रकांत करंजकर | मनोज पुरुषोत्तम सुरती व दिप्ती मनोज सुरती |
| १३ | निळेमोरे-२ | NL२५/७०/२ | ३२०३ | शॉ-वॉलेस प्रा.लि. | सत्येंद्र बानुप्रताप सिंह व प्रीयंका सिंह |
| १४ | निळेमोरे-४ | NL२७/८३/३७ | ३२३८ | विजयशंकर आर यादव | दिनेश गोविंद सोलंकी व दिप्ती दिनेश सोलंकी |
| १५ | निळेमोरे-३ | NL२६/८/३२ | ३३९७ | दिनेश बाळकृष्ण सावंत व रचना दिनेश सावंत | मुरुगानंदन सिनीवासन सुब्बया व सिल्वामनी सुब्बया |
| १६ | निळेमोरे-१ | NL२४/६१/१६ | ३६२८ | दौलत परवेज साहेर व नसली परवेज साहेर | कल्पेश मोहन पवार व विध्या मोहन पवार |
| १७ | निळेमोरे-२ | NL२५/३०/४ | ३६२१ | एस आर फाटक | गणेश दलसुख गोढकीया व संदीप दलसुख गोढकीया |
| १८ | निळेमोरे-१ | NL२४/८५/२४ | ३४०८ | ग्रेस सिलवेल | भवर दौलत सिंह व खेम सिंह |
| १९ | निळेमोरे-२ | NL२५/७१/१३१ | ३७५५ | राजीवी के कामत | हिमांशु अमृत मारु व रोहन अमृत मारु |
| २० | निळेमोरे-३ | NL२६/३१/१६ | ३७५१ | बेलीदा जोजेफ वेलो | पुनम राहुल मिश्रा व राहुल सुभाषचंद्र मिश्रा |

XXX
(सौंदर्या संतोष संखे)
सहायक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, ३ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४


## संपादकीय

# लाडकीपेक्षा दोडकी व्हा...




संपादक दिपक मोरेश्वर नाईक


थोरली असो वा धाकटी, बहीण असतेच भावाची लाडकी. तो दरवर्षी तिच्याकडून राखी बांधून घेतो, भाऊबीजेला ओवाळून घेतो, प्रेमाने तिला हव्या त्या भेटवस्तू देतो. लग्न झाल्यानंतर वषार्तून एक-दोन वेळा तिचे हक्काचे माहेरपण करतो. पण त्याच लाडक्या बहिणीने वडिलांच्या संपत्तीत आपला कायदेशीर वाटा मागितला की मग मात्र भाऊरायांचे पित्त खवळते. तिला तो वाटा मिळत तर नाहीच, वर तिचे माहेरही तुटते. मी देईन त्या भेटवस्तूंच्या तुकड्यांवर समाधान मानशील, तरच तू माझी लाडकी असेच या भाऊरायांचे साधारणपणे म्हणणे असते. पिंडी ते ब्रह्मांडी या न्यायाने घरातला भाऊ जसा वागतो तसाच सत्तेतला भाऊही वागतो. यंदा तर त्याने लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये देण्याचे जाहीर केले. तसे ते दिलेही. वर निवडणुकीनंतर ते २१०० रुपये करण्याचे आश्वासनही दिले. सत्तेत नसलेल्या दुसऱ्या भावाने तर ताई, मला मत देशील तर दरमहा तीन हजार रुपये देईन, असे गाजर दाखवले. पण यातल्या कोणत्याही भावाला होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत आपल्या लाडक्या बहिणीला आपल्या बरोबरीने सत्तेत वाटा द्यावा, असे मात्र वाटले नाही. त्यामुळे २८८ जागा असलेल्या राज्याच्या विधानसभेसाठी सगळ्या पक्षांमध्ये मिळून उमेदवारी मिळाली ३६३ स्त्रियांना. आणि त्यातल्या निवडून आल्या २१ स्त्रिया. म्हणजे दहा टक्केदेखील नाहीत. पण मुळात ज्यांची संख्या नैसर्गिकरीत्याच पुरुषांच्या बरोबरीने आहे, असे मानले जाते, अशा निम्म्या लोकसंख्येला एवढे कमी प्रतिनिधित्व का मिळावे? या पृथ्वीवरचे निम्मे आकाश त्यांचेही आहे. त्यावर त्यांचा नैसर्गिक हक्क असताना त्यात विहरण्याची संधी त्यांना दुसऱ्या कुणीतरी देऊ केली तरच मिळेल, असे का? अर्थात हे काही फक्त आपल्याकडेच घडते असे नाही. जगभरात थोड्याफार फरकाने स्त्रियांच्या राजकीय प्रतिनिधित्वाबाबत हेच चालताना दिसत आले आहे. एखाद्या खंबीर राजकीय पुरुष नेतृत्वाची मुलगी, बहीण, पत्नी, सून असणारी एखादीच राजकारणाच्या वरच्या थरात सहजपणे जाऊन पोहोचू शकते, ममता बॅनर्जी, जयललिता असे खणखणीत अपवाद वगळले तर बाकीच्या अनेकींना मात्र त्यांच्याकडे जेवढी क्षमता आहे, तेवढेही मिळत नाही, असे का व्हावे?

हे आजच घडते आहे, असेही नाही. पहिल्या विधानसभेत म्हणजे १९६२-६७ या कालखंडात निवडून आलेल्या महिला आमदारांची संख्या होती १७. फक्त १९७२-७७ या तिसऱ्या विधानसभेचा अपवाद वगळता महिला आमदारांची टक्केवारी नेहमीच एक आकडीच राहिली आहे. तिसऱ्या विधानसभेत मात्र २८ जणी निवडून आल्या होत्या. ती संख्या त्यानंतर कधीच गाठली गेली नाही. उलट कमी कमी होत ती २.८ टक्के म्हणजे फक्त सहा आमदार (१९९०-९५) एवढीही खाली आल्याचे पाहायला मिळते. गेल्या म्हणजे २०१९-२४ च्या १३ व्या विधानसभेत ही संख्या २७ आमदारांपर्यंत गेली होती. खरे तर महाराष्ट्र हे देशातले पुरोगामी राज्य. स्त्रियांचा राजकीय-सामाजिक पातळीवरचा मोकळा वावर या राज्याला नवीन नाही. तो दृश्यमानही आहे. मात्र इथल्या राजकीय क्षेत्रातला त्यांचा सहभाग आणि प्रभाव मात्र नगण्यच राहिला आहे. यंदाच्या निवडणुकीत मात्र त्यांना अतोनात महत्त्व आले, पण ते मतदार म्हणून. मध्य प्रदेशातील ह्यलाडली बहनाह्ल ही योजना महाराष्ट्रातही राबवण्याचे महायुती सरकारने जाहीर केले. ठिकठिकाणी फॉर्म भरण्यासाठी लाडक्या बहिणींच्या रांगा लागल्या आणि अवघ्या निवडणुकीचे चित्रच पालटले. या बहिणींमुळे महायुतीला स-हा टक्के जास्त मते मिळाल्याची आकडेवारी निवडणुकीनंतर प्रसिद्ध झाली आहे. पण म्हणूनच तोच मुद्दा पुन्हा पुन्हा उपस्थित होतो की बहिणी आहेतच एवढ्या लाडक्या तर त्यांची गणना




१५०० रुपये घेऊन मते देणाऱ्यांमध्ये का व्हावी? विधानसभेत त्यांनी आपल्या बरोबरीने विधिमंडळात बसावे असे भाऊरायाला का वाटत नाही? त्यासाठी आवश्यक गोष्टी तो का करत नाही? स्त्रियांची सत्तेत वाटा मागण्याची लायकीच नाही, असेही नाही. १९९२-९३ साली झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण मिळाल्यानंतर गावखेड्यातल्या निरक्षर स्त्रियांनी कमाल करून दाखवली, हा इतिहास फार जुना नाही. आज हजारो स्त्रिया या पातळीवरच्या निर्णयप्रक्रियेत आहेत आणि उत्तम पद्धतीने काम करत आहेत, असे सांगितले जाते. विधानसभेच्या कामकाजाचा वेगवेगळ्या पातळ्यांवर अभ्यास करणाऱ्या एका संस्थेच्या मते महाराष्ट्राच्या राजकारणातही जाण असलेल्या, नीट समजून उमजून काम करणाऱ्या, चांगले काम करण्याची मनापासून इच्छा असलेल्या अनेक जणी आहेत. पण एकेका लहानसहान संधीसाठीदेखील त्यांना खूप वाट पाहावी लागते. वर्षा गायकवाड, यशोमती ठाकूर, नीलम गोऱ्हे, प्रतिभा धानोरकर, मेघना बोर्डीकर, वंदना चव्हाण, देवयानी फरांदे, भारती लव्हेकर, मनीषा चौधरी अशा अनेक जणींना राजकारणाची उत्तम समज आहे. त्यांच्याकडे नवनव्या कल्पना असतात. पण स्वतःची बुद्धी असणाऱ्या, ती वापरण्याची क्षमता असणाऱ्या स्त्रियांना अजिबात स्थान मिळत नाही.

खरे तर मुळात राजकीय महत्त्वाकांक्षा असणे, ती समजून घेऊन काम करणे, राजकीय पक्षात जागा निर्माण करणे, आमदारकीचे तिकीट मिळवणे, निवडून येणे, मंत्रीपद मिळवणे आणि लोकोपयोगी काम करणे, आपले काम, आपले स्थान लोकांच्या मनावर ठसवणे ही मोठी आणि वेळखाऊ, ऊजार्खाऊ प्रक्रिया आहे. पुरुषांनाही या सगळ्या प्रक्रियेतून जावे लागतेच, पण त्यांच्यासाठी अधिक संधी उपलब्ध असतात. तीच संधी स्त्रीलाही हवी असेल तर तिच्याकडे पुरुषापेक्षाही अधिक काहीतरी असावे लागते. सिंचन या विषयात रस असलेल्या, शेतकरी कुटुंबातून आलेल्या एका महिला आमदाराची या विषयावर कधीच बोलायला मिळत नाही, अशी तक्रार असते. गेल्या वेळच्या म्हणजे २०१९-२४ या काळात तर २७ जणी निवडून गेल्या. पण त्यापैकी एकाही स्त्री आमदाराला मंत्रीपद मिळाले नाही. गेल्या अडीच वर्षांत तर, अगदी महिला ब्र बालकल्याण हे महिलांचे हक्काचे मानले जाणारे खातेदेखील मंगल प्रभात लोढा यांच्याकडे गेले. आपली धगधगती राजकीय महत्त्वाकांक्षा विनासंकोच पुढे रेटत एक पक्ष उभारणाऱ्या आणि एका राज्याची सत्ता ताब्यात घेणाऱ्या ममता बॅनर्जींनी अधिकाधिक स्त्रियांना संधी देण्याचे राजकारण केले. तिथे ४२ खासदारांमध्ये २९ तृणमूलचे आणि त्यात ११ स्त्रिया (३७.९ टक्के) आहेत. त्यांच्या विधानसभेतही ३७ महिला आमदार आहेत आणि त्यातल्या ७ मंत्री आहेत. तमिळनाडूमध्ये जयललितांनीही 'अम्मा' अशी आपली प्रतिमा निर्माण करून काहीसे स्त्रीवादी राजकारण उभारले. स्वतःची स्वतंत्र प्रतिमा निर्माण करण्याची धमक आजवर महाराष्ट्रात स्त्री नेतृत्वाकडून दाखवली गेली नसली तरी मृणाल गोरे, प्रतिभा पाटील, शालिनीताई पाटील, प्रेमलाकाकी चव्हाण, केशरकाकू क्षीरसागर, सुप्रिया सुळे, पंकजा मुंडे, प्रणिती शिंदे, विद्या चव्हाण यांच्याकडे आणि अशा आणखी काही जणींकडे राजकीय महत्त्वाकांक्षा होती, आहे. पण ती साधी व्यक्त करणेदेखील काही जणींसाठी आयुष्यभराचा धडा ठरला आहे. सत्तातुर पुरुषप्रधान व्यवस्थेचा अवकाशच असा घडला आणि घडवला गेला आहे की लाडकेपणाचा आव आणत भावनिकतेच्या ओज्याखाली स्त्रीला इतके सहज गुदमरून टाकता येते. त्यातून मान वर उचलून ताठ उभी राहणारी आणि आपले हक्क खणखणीतपणे मागणारी दोडकी बहीण मात्र कुणालाच नको असते. आपले दोडकेपण हेच आपले सामर्थ्य आहे, याचे भान लाडक्या बहिणीला येईल तीच खरी सुरुवात असेल

# वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस

डॉ. जगदीशचंद्र बोस हे एक भारतीय जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ तसेच पुरातत्त्वज्ञ होते. त्यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ रोजी पूर्व बंगालमधील राणीखल येथे झाला. लहानपणापासूनच जगदीशचंद्र आजूबाजूचा निसर्ग पहायचे, त्याचे निरीक्षण करायचे. निसगार्तील अनेक गोष्टी पाहून त्या अशाच का, असा प्रश्न त्यांना पडे. जगदीशचंद्र कोलकाता येथील सेंट झेवियर शाळा व महाविद्यालयात शिकले. त्यानंतर इंग्लंडच्या खाईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन वनस्पतीशास्त्र आणि निसर्गविज्ञानाचा अभ्यास पूर्ण करून ते भारतात परत आले. इंग्लंड व कोलकाता येथील प्रेसिडेन्सी महाविद्यालयात १८८५ ते १९१५ अशी ३० वर्षे भौतिकशास्त्र शिकवत असतानाच जगदीशचंद्रांनी विद्युतशक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरंगांचा शोध घेऊन त्यांनी बॅटरी बनवली. विद्युतशक्तीवरील संशोधनानंतर ते वनस्पतीशास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूतील साम्य आणि भेद याचा त्यांनी अभ्यास केला. स्नायू, मज्जातंतू, सुख-दुःख आदी विकार यांचा वनस्पतीबाबत त्यांनी धांडोळा घेतला. त्यांनी थंडी, प्रकाश, विद्युत, उष्णता या घटकांचा वनस्पती व प्राणी यांच्यावरील परिणामांचा अभ्यास केला. वनस्पतींचे श्वसन, रुधिराभिसरण पद्धतीने होणारे त्यांच्यातील कार्य, अन्नाची ने-आण, निरुपयोगी वस्तूंचा निचरा हे त्यांच्या संशोधनाचे विषय होते. त्यांच्या याच संशोधनातून वनस्पतींना संवेदना असतात हे त्यांनी सिद्ध केले. भारतीय वैज्ञानिक सोहिनी चक्रबोर्ती यांनी २०१६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या संशोधनातून ही प्रक्रिया उलगडून दाखविली आहे. वनस्पतीशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी रेझोनंट रेकॉर्डर, ऑसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाऊंड लेव्हलर, क्रेसकोग्राफ, बॅलिन्सिंग ॲपरेटस आदी उपकरणे तयार केली.

# खरे आव्हान 'वीर'



चीन आणि भारत स्पर्धेत भेटतील त्या वेळी हे युद्ध खऱ्या अथार्ने भडकणार, अशीच सर्वांना अपेक्षा होती. प्रत्यक्षात चीनने जगज्जेत्या डिंगला झाकून ठेवले, पण गुकेशच्या अप्रतिम खेळामुळे भारताने डिंग शिवाय खेळणाऱ्या चीनला पराभूत केले.

काही वर्षांपूर्वी इंग्लिश ग्रँडमास्टर नायजेल शॉर्टला विचारण्यात आले की पुढचा विश्वविजेता कोण असेल. त्यावर नायजेल म्हणाला होता की आता सांगणे कठीण आहे, पण आणखी १० वर्षांनी होणारा विश्वविजेता भारतीय असेल हे मी आज खात्रीपूर्वक सांगू शकतो. आज नायजेलचे भाकीत खरे होण्याची वेळ आली आहे. जगज्जेतपदाची लढत गुकेश जिंकणार यात कोणालाही शंका नाही. तो कितव्या डावात जिंकणार, यात तज्ज्ञच नव्हे तर माजी खेळाडूंत चर्चा झडत आहेत. भारतात जन्मलेल्या बुद्धिबळाने आज आपल्या जन्मभूमीला जगाच्या अग्रस्थानी नेवून ठेवले आहे. आता ते टिकवण्याची जबाबदारीही जेमतेम विशीत असलेले युवकच पेलत आहेत. त्यातून नवे खेळाडू सातत्याने पुढे येत आहेत. जगज्जेतपद लढतीस प्रतिस्पर्धी कसे पात्र ठरतात, हा प्रवास जाणून घेणेही लक्षवेधक ठरेल.

भारतीय खेळाडू जगज्जेतेपदाच्या लढतीत किंवा स्पर्धेत संभाव्य विजेताच होईल, यावर सर्व संबंधित खेळजगताचे एकमत होईल ही घटना विरळाच. गुकेश मात्र यास सन्माननीय अपवाद ठरला आहे. गुकेशच जगज्जेत्या डिंग लिरेनविरुद्धची जगज्जेतपदाची लढत जिंकणार, असेच सांगितले जात आहे. भारतीय बुद्धिबळपटू आता केवळ आव्हान देणारे राहिलेले नसून ते आता आव्हान वीर अर्थात आव्हान जिंकणारे वीर झाले आहेत. सध्या विश्वविजेतेपदाची लढत सिंगापूरच्या निसर्गरम्य सेंटोसा बेटावर सुरू आहे. जगज्जेत्या डिंग लिरेनला भारताचा नवयुवक ग्रँडमास्टर दोमाराजू गुकेश आव्हान देत आहे. हा १८ वर्षीय खेळाडू जागतिक विजेतेपद आपल्याकडे आणि पयार्याने भारताकडे खेचून घेण्याची शर्थ करत आहे. त्यात त्याला यश येईल असा अनेकांचा अंदाज आहे. १९७२ च्या प्रसिद्ध बोरिस स्पास्की - बॉबी फिशर यांच्यातील बहुचर्चित पटावरील युद्धानंतर भारतीयांनी पहिल्यांदाच एवढा रस बुद्धिबळ जगज्जेतपदाच्या लढतीत दाखवलेला दिसतो. भारतीयच कशाला-संपूर्ण विश्वातील अब्जावधी बुद्धिबळ रसिक आपापल्या संगणकावर किंवा स्मार्टफोनवर डिंग-गुकेश लढत बघत आहेत. अचानक भारतात बुद्धिबळाचे वारे जोरात वाहू लागले आहे. खरं तर हे वारे नव्हेच, ही तर वावटळ म्हणता येईल. सर्वत्र बुद्धिबळाच्या पट, सोंगट्या, पुस्तके, सॉफ्टवेअर्स यांचा खप वाढला आहे. प्रशिक्षकांना मोठी मागणी आली आहे. गावागावांत स्पर्धांची संख्या वाढली आहे. आनंद, गुकेश, अर्जुन, प्रज्ञानंद, हे बुद्धिबळपटू आहेत, हे कोणालाही सांगावे लागत नाही. त्यांची नावे लोकांच्या तोंडी बसली आहेत. या सर्व लोकप्रियतेच्या लाटेमागे भारतीयांचे काही महिन्यांतील पराक्रम कारणीभूत आहेत. विश्वनाथन आनंदने पाच वेळा जगज्जेतपद जिंकले होते, त्याने तत्कालीन सोविएत संघराज्याच्या बुद्धिबळातील वर्चस्वाला हादरा दिला होता. त्यानंतरही त्याला जितकी प्रसिद्धी मिळाली नसेल, इतकी आज विश्वविजेता होण्याआधी गुकेशला मिळत आहे.

### सुवर्णपदकांची लयलूट

जागतिक पटावरील यशाची भारतीयांना सवय लागत आहे. भारतीय संघ दोन महिन्यांपूर्वी बुद्धिबळ ऑलिम्पियाड खेळण्यासाठी हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे उतरला त्या वेळी गतस्पर्धेतील ब्राँझ पदक विजेते ही त्यांची ओळख होती. भारताच्या पुरुष आणि महिला या दोन्ही संघांनी ब्राँझ पदक मिळवून चेन्नई येथील ४४वे ऑलिम्पियाड गाजवले होते. परंतु चिनी संघ चेन्नईला नव्हते, अशी रुखरुख रसिकांच्या मनात होतीच. बुडापेस्टला पुरुष गटात १९३ संघ होते तर महिलांनी १८१ संघांचा सहभाग होता. जगज्जेतपदाची लढत देणारा गुकेश आणि गुणांकनात गुकेशला देखील मागे टाकणारा अर्जुन एरिगेसी यांच्यावर तज्ज्ञांची खास नजर होती.

### ऐनवेळेची मुसंडी

२०२३ च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात चेन्नई ग्रँडमास्टर स्पर्धेकडे जगाचे लक्ष लागून राहिले होते कारण त्यामध्ये भाग घेणाऱ्या तीन जणांना कॅन्डिडेट स्पर्धेत भाग घेण्याची संधी होती. चेन्नई ग्रँडमास्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून गुकेशने आपला सहकारी अर्जुन एरिगेसी आणि इराणचा फरहाम मकसूदलू यांना मागे टाकले आणि कॅन्डिडेट स्पर्धेत प्रवेश मिळवला. जो कँडिडेट्ससाठी पात्र ठरलेला अखेरचा खेळाडू होता, तोच कँडिडेट्सचा विजेता झाला आणि आव्हानवीरही, हा इतिहास सर्व इतिहास रसिकांना माहिती आहेच.


**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**Garden Department**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

2nd floor, Ward committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kankia, Miraroad (East) Tal Dist. – Thane 401107 Tel No. 28103409

Ref.no./MBMC/Garden/Miraroad/734/2024-25 Date:- 27/11/2024

**// TENDER NOTICE //**

Mira Bhaindar Municipal Corporation Garden Department invites sealed B-1 tender form for following work in two envelope system at the day 10/12/2024 up to 1.00 pm. The tender form and other relevant document will be available for download on https://mahatenders.gov.in from the date 29/11/2024 to 10/12/2024 till 1.00 pm. The tender shall be opened in the presence of the bidders or their representatives on the day 11/12/2024 at 01.00 pm at the tender cell of Mira Bhaindar municipal corporation.

| Sr. No. | Name of work | Estimate Cost (inclusive Taxes) | Earnest Money Deposit (EMD) | Cost of tender documents |
|---|---|---|---|---|
| 1. | Preparation of landscaping work at Silver park to srushti divider in MBMC area. | Rs. 29,50,658/- (Rs. Twenty Nine Lakh Fifty Thousand Six hundred Fifty eight only) | Rs. 29,507/- (Rs. Twenty Nine Thousand Five Hundred Seven only) | Rs. 500+90(GST) = 590/- (Rs. Five Hundred Ninety Only) Non Refundable |

Note :- 1) Tender form should be submitted through Online System in two envelope
2) Tender form fee not refundable.
3) Hon. Commissioner of Mira Bhaindar Municipal Corporation has reserve Right to reject any or all bids, without assigning any reasons.
4) The Period of tender law admissibility is 120 days.

Ref. No:- MBMC/PRO/471/2024-25
Date :- 28/11/2024

Sign
(Kalpita Pimple)
Dy. Commissioner (Garden)
Mira Bhaindar Municipal Corporation

## विनाहेल्मेट दुचाकीस्वार व सहप्रवाशावर कारवाईचा बडगा

# मुंबईत विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर २ वर्षात १०७ कोटींचा दंड



### यावर्षी मुंबईतील कारवायांमध्ये वाढ

मुंबई वाहतूक पोलिसांनी २०२३ मध्ये नऊ लाख ४२ हजार २८४ कारवायांमध्ये ४६ कोटी ९९ लाख ३२ हजार एवढा दंड चालकांवर आकारला आहे. यावर्षी पोलिसांनी विनाहेल्मेट दुचाकी चालवणाऱ्यांविरोधात कारवाई आणखी तीव्र केल्यामुळे २७ नोव्हेंबर २०२४ पर्यंतत मुंबई वाहतूक पोलिसांनी ८ लाख २७ हजार ८१२ ई-चलनद्वारे ६० कोटी ९३ लाख ८१ हजार ५०० रुपयांच्या दंडात्मक कारवाया केल्या आहेत. दोन वर्षांमध्ये सुमारे १०७ कोटी रुपयांच्या दंडात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

■ **मुंबई** : विनाहेल्मेट दुचाकीस्वार व पाठीमागे बसलेल्या सहप्रवाशावर कारवाई करण्याचे आदेश राज्य वाहतूक विभागाचे अपर पोलिस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात विनाहेल्मेट प्रवास करणारे दुचाकीस्वार व सहप्रवाशांविरोधातील कारवायांमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. गेल्या दोन वर्षात मुंबईत पोलिसांनी विनाहेल्मेट प्रवास केल्याप्रकरणी १७ लाख ७० हजार कारवायांमध्ये १०७ कोटी रुपये दंड आकारला आहे. विनाहेल्मेट दुचाकीस्वार व सहप्रवासी यांचे अपघात, त्यात मृत्युमुखी, तसेच जखमी होणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे विनाहेल्मेट दुचाकीस्वार व पाठीमागे बसलेला सहप्रवासी अशा दोघांवर कारवाई करण्याचे आदेश वाहतूक विभागाच्या अपर पोलीस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. त्यासाठी वाहतूक पोलिसांच्या ई-चलन यंत्रामध्ये बदल करून वेगळ्या नोंदी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहे. त्यामुळे भविष्यात विनाहेल्मेट प्रवास करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबण्यात येणार आहेत.

दुचाकीस्वार व त्याच्या मागे बसलेल्या सहप्रवाशांनी हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. यापूर्वीच कायद्यात त्याबाबत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. पण हेल्मेट न घातलेल्या सहप्रवाशाविरोधात एवढ्या सक्तीने कारवाई केली जात नव्हती. दुसऱ्या बाजूला विनाहेल्मेट दुचाकीस्वारावर कडक कारवाई केली जात होती. त्याबाबत विशेष मोहिमही राबवण्यात येत होती. मात्र या नव्या सूचनांनंतर सहप्रवाशावरील कारवायाही वाढवल्या जातील.

## शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा पुन्हा अडचणीत

# घर आणि ऑफिसवर ईडीची धाड



### राज कुंद्राने पॉर्न फिल्म निर्मितीतून कमावले कोट्यवधी रुपये

राज कुंद्रा आणि त्याच्या कंपनीने पॉर्न फिल्म्सद्वारे फक्त बक्कळ कमाई केली नाही तर त्यांनी देशाच्या कायद्यांना बगल देण्यासाठी संपूर्ण व्यवस्था केली होती, असा दावा पोलिसांनी केला होता. पण हे प्रकरण उघडकीस आलं तरी कसं ? मुंबई पोलिसांनी यासंदर्भात ४ फेब्रुवारी २०२१ मध्ये एक केस दाखल केली होती. मालवणी पोलिस स्टेशनमध्ये या रॅकेटसंदर्भात एका मुलीने तक्रार दाखल केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती.

■ **ठाणे** : प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांच्या अडचणी वाढल्या आहेत. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा या दोघांच्या घरावर आणि ऑफिसवर ईडीची धाड पडली आहे. जुहू येथील घर आणि ऑफिसवर ही धाड पडली आहे त्यामुळे या दोघांच्या मागे सुरु असलेलं शुक्लकाष्ठ काही संपता संपत नाही अशी स्थिती आहे.

**शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्या अडचणी वाढल्या**

पोर्नोग्राफी नेटवर्क प्रकरणात ईडीने ही कारवाई करत धाड टाकली आहे. ईडीने गुन्हा दाखल केल्यानंतर आता शिल्पा आणि राज कुंद्रा यांचं घर तसेच ऑफीसची झडती घेतली जात आहे. ह्यअश्लीलह्ण चित्रपट बनवल्याप्रकरणी राज कुंद्रा याला जून २०२१ मध्ये अटक करण्यात आली होती. कुंद्रा हा या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचा दावा मुंबई पोलिस अधिका[illegible]यांनी केला होता. दोन महिने तुरुंगात घालवल्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये त्याला जामीन मिळाला आणि तो बाहेर पडला.

**मालाड येथील बंगल्यावर छापा मारण्यात आला होता**

चित्रपट आणि ओटीटीवर काम मिळवून देण्याच्या नावाखाली काही लोक तरूणींना अश्लील चित्रपटात काम करण्याची जबरदस्ती करत आहेत, असे या तक्रारीत नमूद करण्यात आलं होतं. मुंबईतील अनेक व्यावसायिक अश्लील चित्रपटांचे शूटिंग करून मोठी कमाई करत आहेत असा दावाही या तक्रारीत करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी मालाड वेस्टमधील एका बंगल्यावर छापा मारला. तो बंगला भाड्याने घेऊन तेथे पॉर्न फिल्मचे शूटिंग करण्यात येत होतं. पोलिसांनी छापा टाकून बॉलिवूडमधील एका अभिनेत्रीसह ११ जणांना अटक केली होती.

# तीन महिन्यांत ५२ हरवलेले मोबाईल शोधले



**डोंबिवली** । महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत हरवलेल्या मोबाईल फोन संदर्भात नागरिकांच्या वारंवार तक्रारी आल्यानंतर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांनी तातडीने तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले. या पथकाने नागरिकांच्या हरवलेल्या मोबाईल फोनचा शोध घेण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय कामगिरी बजावली असून, मागील तीन महिन्यांत ५२ मोबाईल फोन परत मिळवण्यात यश मिळवले आहे. या मोबाईल फोनची एकूण किंमत ५,८८,५०० रुपये आहे. हरवलेल्या मोबाईल फोनच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी पोलीस शिपाई विजय कोळी यांनी सर्व तक्रारींची माहिती सी.ई.आय.आर पोर्टलवर अपडेट केली. यानंतर तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने मोबाईल फोनचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले. तपास पथकातील अधिकारी आणि अंमलदार यांच्या सहकार्याने या मोहिमेत यश मिळाले.

हरवलेल्या मोबाईल फोनचे मूळ मालक ओळखून त्यांना हे फोन परत देण्यासाठी विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण, संजय जाधव आणि पोलीस उपायुक्त परिमंडळ ३, कल्याण, अतुल झेंडे यांच्या हस्ते मोबाईल फोन मूळ मालकांना परत करण्यात आले. नागरिकांनी पोलिसांच्या या कार्याबद्दल आभार व्यक्त केले. या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावणार्या अधिकारी आणि कर्मचार्यांचे योगदान वाखाणण्याजोगे आहे. या कामगिरीत प्रमुख भूमिका निभावलेल्या अधिकार्यांमध्ये ज्ञानेश्वर साबळे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक), विजय नाईक (पोलीस निरीक्षक, गुन्हे), सोपान नांगरे (पोलीस निरीक्षक, प्रशासन), सहपोलीस निरीक्षक स्वप्नील भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक विकास मडके, पोलीस हवालदार चित्ते, पोलीस कर्मचारी कांगरे, विजय कोळी, दिपक थोरात, श्रीधर वडगावे यांचा समावेश आहे.महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याने नागरिकांच्या तक्रारींवर जलद आणि प्रभावी कारवाई करत आपल्या कार्यक्षमतेचा उत्कृष्ट आदर्श सादर केला आहे. हरवलेल्या मोबाईल फोनचे परत मिळणे हे नागरिकांसाठी आनंददायक ठरले असून, पोलीस विभागावर विश्वास वाढवण्यासाठी या मोहिमेने मोलाची भूमिका बजावली आहे. पोलीस विभागाच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे नागरिकांनी त्यांचे कौतुक केले असून भविष्यात अशा प्रकारे अधिक तत्परतेने काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.


## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती "अ" बोळींज विरार**

**जा.क्र : व.वि.श.म. बोळींज /कर/४२३/२०२४-२५**
**दिनांक २८/११/२०२४**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिनियम ४६७, प्रकरण ३ मधील १(१) व १(२) अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदभार्ने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधकाने हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका मध्ये याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र | दिनांक | मालमत्ता क्र. | वार्ड क्र. | मालमत्तेचे ठिकाण | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कत्यार्चे नाव | खरीदाराचे किंवा अभिहस्तांकन कत्यार्चे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९-०९-२०२४ | VR२७/१४/११ | २७ | छाया कुटीर, बी- ०५ | स्वपान बानिक | चिराग कमलेश दर्जी व प्रिती चिराग दर्जी |
| २ | १९-०९-२०२४ | VR१७/५६७/१७३ | १७ | श्री शास्वत अ/४, एस जी १, बिं.नं.४, ग्लोबलसिटी | श्री, शास्वत/संजयकुमार साहू व सुनिता स. साहू | कमलेश मुलशंकर खूत |
| ३ | १९-०९-२०२४ | VR१७/४८९/११ | १७ | हिरू अपार्टमेंट बिल्डीग नं.-२, ए-३०२ | संजय मोहन बाठे | समीर बारकु गोविंद व सविता समीर गोविंद |
| ४ | २६-०९-२०२४ | VR१५/६३५/१ | १५ | साई आस्था नं.०१ देशमुख गल्ली नं.२ नित्यानंद सावलीच्या मागे डोगंरपाडा | मनोज महेश भाई शर्मा | भिवा दत्ताराम परब |
| ५ | २६-०९-२०२४ | VR१३/२० | १३ | इंटरप्रायजेस | रॉयल इंटरप्राजेस | अवधुत को. ऑप.हौ.सो.लि. |
| ६ | २७-०९-२०२४ | VR१७/६७५/९२१ | १७ | एक्रोपोलिस सेक्टर ३, बिं.नं.३ व ४, रुम नं.एल-१०२ एक्रो.रचना टॉवर समोर, ग्लोबलसिटी | अमित निमकर | शारीवा अमित निमकर |
| ७ | ३०-०९-२०२४ | VR२४/३/१३ | २४ | विराट नगर लक्ष्मी निवास को. ऑप. हौ.सो., बी-१०५ | हरिचंद्र रोगु कोडविलकर / शुभांगी हरिश्चंद्र कोडविलकर | स्वेता सुबोध जाधव |
| ८ | ३०-०९-२०२४ | VR१५/६४८/१४ | १४ | नारायण अपार्ट, रूम नं. १०९ राधाकृष्ण मंदिर तलाव, डोंगरपाडा | दिपाली दिलीप राऊळ | श्वेतांबरा सुनिल तांबे |
| ९ | ३०-०९-२०२४ | VR२७/५३/८९ | २७ | विघ्नेश्वर को.ऑप.हौ.सो, बी-२ एम बी इस्टेट | जगदीश शंकर हेगडे | फतेह सिंह व नाथी डब्लू / ओ फतेह सिंह |
| १० | ३०-०९-२०२४ | VR२७/३५/८ | २७ | चेरीस सागर को. ऑप. हौ.सो, रूम नां. २०१, विवा कॉलेज रोड | जयलक्ष्मी व्यंकटराम अय्यर / मीना सनत राजदेव / सनत नरभेराम राजदेव | रितेश मोहन पाटील |
| ११ | ३०-०९-२०२४ | VR२७/८९/८ | २७ | श्रीपाल होम, रूम नं.०३, विवा कॉलेज रोड | मंगला देबु मिठाबावकर / जयराम दिनानाथ कोटीयन / कल्यानी दि. कोटीयन | राकेश रामचंद्र लोटणकर / पूजा राकेश लोटणकर |
| १२ | ३०-०९-२०२४ | VR१४/१३०/२३ | १४ | गोविंद हाईट्स, रूम नं.४०४ पंजाब नॅशनल बँक समोर | मनी गोविंद कन्स्ट्रक्शन / संतोष नरेंद्र जैन तर्फे निशांत चोरघे | आशिष लवू नाईक व संगीता आशिष नाईक |
| १३ | ३०-०९-२०२४ | VR१५/६४८/२२ | १५ | नारायण अपार्ट, रूम नं.२०७ राधाकृष्ण मंदिर तलाव, डोंगरपाडा | जय मल्हार डेव्हलपर्स | वैभव बाबाजी सावंत |
| १४ | ३०-०९-२०२४ | VR१५/६४८/२३ | १५ | नारायण अपार्ट, रूम नं.२०८ राधाकृष्ण मंदिर तलाव, डोंगरपाडा | जय मल्हार डेव्हलपर्स | दिनेश काशिराम गोमले |
| १५ | ३०-०९-२०२४ | VR१५/६४८/२७ | १५ | नारायण अपार्ट, रूम नं.३०२ राधाकृष्ण मंदिर तलाव, डोंगरपाडा | जय मल्हार डेव्हलपर्स | चंद्रकांत भागोजी चांदे |
| १६ | ३०-०९-२०२४ | VR१५/६४८/३७ | १५ | नारायण अपार्ट, रूम नं.४०२ राधाकृष्ण मंदिर तलाव, डोंगरपाडा | जय मल्हार डेव्हलपर्स | प्रमोद पांडूरंग भेकरे |
| १७ | ३०-०९-२०२४ | VR१५/६४८/१५ | १५ | नारायण अपार्ट, रूम नं.११० राधाकृष्ण मंदिर तलाव, डोंगरपाडा | जय मल्हार डेव्हलपर्स | सुशांत सुनिल विटमल |
| १८ | ०१-१०-२०२४ | VR११/१५/२७ | ११ | मनतारा अपार्टमेंट बी झ्र रूम नं. २०५ | कंबाईन सेल्स प्रमोशन | शीला दिनेश सिंह व कृष्णा दिनेश सिंह |
| १९ | ०१-१०-२०२४ | VR१७/५१८/१२२३ | १७ | रूस्तमजी एव्हरशाईन जॉईट वेंन्चर, एव्हेन्यु ज, | राजेश दादुसिंग राठोड व पायल राजेश राठोड | प्रशांत बी वाढैया व निमीषा प्रशांत वाढैया |
| २० | ०१-१०-२०२४ | VR१७/६०६/४० | १७ | विआन क्लासिक बिं.नं. ३, रूम नं. ६०२ अष्टविनयक मंदिर च्या बाजुला ग्लोबलसिटी | रिंकी जितेंद्र रुपारेलिया | विकास विजय सिंह |

**(शशिकांत पाटील)**
प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती ''अ'' बोळींज
वसई विरार शहर महानगरपालिका



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com